# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./1483/२०१८

दिनांक : २१/०५/२०१८

## परीपत्रक

**( उन्हाळी २०१८ या परीक्षेच्या मुल्यांकनाबाबत )**

गोंडवाना विद्यापीठाची उन्हाळी २०१८ ही परीक्षा ०५ एप्रिल २०१८ पासुन सुरू झाली असुन उत्तरपत्रिका मुल्यांकनाचे कार्य १) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली २) शांतारामजी पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपूर ३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथे विद्यापीठाने स्थापन केलेल्या उत्तरपत्रिका मुल्यांकन केंद्रावर मुल्यांकनाचे कार्य सुरू असुन संबंधित मुल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांना मुल्यांकन करण्याबाबतचे पत्र विद्यापीठाव्दारे निर्गमीत करण्यात आलेले आहे. जे प्राध्यांपक मुल्यांकनाकरीता विहीत मुदतीत रूजु झालेले नाही, अश्या प्राध्यांपकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेले आहे. परंतु अजुनही काही प्राध्यांपक मुल्यांकनाकरीता संबंधित मुल्यांकन केंद्रावर रूजु झालेले नाही. मुल्यांकनाची प्रक्रिया विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असल्याने या परीपत्रकाव्दारे संबंधितांना कळविण्यात येते की, ज्या प्राध्यापकांना मुल्यांकना करीता पत्र प्राप्त झालेले असुनही जे प्राध्यापक मुल्यांकनाकरीता अनुपस्थित आहेत. अश्या प्राध्यांपकांनी त्वरीत मुल्यांकन केद्रांवर रूजु होवुन आपल्या विषयाचे मुल्यांकनाचे कार्य पार पाडावे.

अन्यथा विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार कलम ४८ (४) व (५) नुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या पत्रानुसार आवश्यक पुढील कार्यवाही घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच जे प्राध्यापक परीक्षा केंद्राधिकारी/सह. केद्राधिकारी व अंतर्गत पर्यवेक्षक म्हणुन रूजु झालेले असुन त्यांच्या परीक्षा केंद्रावरील पेपर/परीक्षा संपलेली आहे. अश्या प्राध्यापकांनी त्यांना मिळालेल्या पत्रानुसार मा. प्राचार्य यांचे आवश्यक कार्यमुक्त प्रमाणपत्र घेवुन मुल्यांकन केंद्रावर रूजु होवून उत्तरपत्रिका मुल्यांकनाचे कार्य तातडीने पार पाडण्यास सहकार्य करावे.

मा. कुलगुरू महोदय यांच्या आदेशान्वये

(डॉ. जे.व्ही.दडवे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :–**

- मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर.
- मा. प्र.कुलगुरू महोदय यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरिता सादर.
- डॉ. मधुकर नक्षिणे, मुख्य मुल्यांकन केंद्राधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
- सहमुल्यांकन केंद्राधिकारी, शांतारामजी पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपुर.
- सहमुल्यांकन केंद्राधिकारी, शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपुर.